


Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : ७७७. वा सोमवार दि. २० मे २०२४ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# जिल्हा सामान्य रुग्णालयात भ्रष्टचाराचा कहर सुरूच या भ्रष्टचाराच्या साखळीत नवीनच वळण...

## माजी भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे व आता दुसऱ्यांनीही काढली कोट्यवधी रुपयांची विविध भ्रष्टाचाराची काढली करोडो रुपयांची खोटी बिले सिटी न्यूज कडे तक्रारकर्त्यांनी दिले सर्व पुरावे...

## उर्वरित भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई होईपर्यंत आम्ही करू पाठपुरावा?

**पोस्टमार्टम ८७**

**जिल्हाधिकारी साहेबांच्या शासकीय आदेशाची बेजबाबदार सा. बा. उप विभागीय विद्युत विभाग अधिकारी गौरकर कडून नियमांचा भंग**

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयातील अनागोंदी कारभार व बोकाळलेल्या भ्रष्टाचाराचा सातत्याने भंडाफोड करणाऱ्या सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या लढ्याल प्रचंड असे यश प्राप्त झालेले आहे. सरकारी यंत्रणेत राहून भ्रष्टाचाराचे लोणी खाऊन-खाऊन बोके बनलेल्या अधिकाऱ्यांवर आता कारवाईचा बडगा उगारला जाऊ लागला आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नेहमीचर्चेत अडलेले भांडार विभागात कार्यरत असताना साहित्य खरेदीत प्रचंड भ्रष्टाचार करणाऱ्या माजी भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले आहे. या कारवाईमुळे जिल्हा रुग्णालयातील इतर भ्रष्टाचाऱ्यांचे धाबे दणाणले असून, सगळीकडे सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या भ्रष्टाचारविरोधी लढ्याचे मोठे कौतुक करण्यात आले आहे.तत्कालीन अकोला आरोग्य उपसंचालक तरंगतुषार वारे यांनी काढलेल्या एका आदेशानुसार प्रकाश बोथे यांना निलंबित करण्यात आले असून, निलंबन काळात त्यांची बदली वाशिम येथील क्षयरोग कार्यालयात करण्यात आली आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजच्या सोबतच बुलढाण्याचे लोकप्रिय आमदार संजय गायकवाड यांनी यासंदर्भात थेट विधिमंडळात प्रश्न उपस्थित करून हा प्रश्न सरकार दरबारी मांडण्याचा प्रयत्न केला होता. प्रकाश नामदेव बोथे हे अनेक वर्षे जिल्हा सामान्य रुग्णालयातील भांडार विभागात भांडारपाल म्हणून कार्यरत होते. त्यांच्या कार्यकाळात भांडार विभागाचा भंडारा झाला होता. त्यांच्या कार्यकाळात अनेक प्रकारची साहित्य,उपकरणे,औषधींची खरेदी करण्यात आली होती. मात्र, यातील बरेचसे साहित्य हे भांडार विभागात कधी पोहोचलेच नाही. खरे तर या प्रकरणात केवळ प्रकाश बोथे यांच्या निलंबनावर भागणार नाही. कारण जिल्हा रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांसाठी मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात आलेल्या साहित्याला पाय कसे फुटले आणि हे साहित्य गेले कुठे, याचा उलगडा बोथे यांची सखोल चौकशी करून व व्याजासह वसुली करूनच होईल. शिवाय या प्रकरणात आणखी कोणा-कोणाचे हात ओले झाले आहेत आणि कोणी-कोणी आपल्या तुंबड्या भरण्याचे काम केले आहे, त्याचाही उलगडा होणे गरजेचे आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज जिल्हा रुग्णालयासह स्त्री जिल्हा रुग्णालयात जो काही भ्रष्टाचार बोकाळला आहे, त्यासंदर्भात आम्ही सातत्याने भंडाफोड करीत आहे. एव्हढेच नाही तर काही महिन्यांपूर्वी जेंव्हा जिल्हा रुग्णालयातील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी एक समिती आली होती, त्या समितीला प्रत्यक्ष भेटून भ्रष्टाचरासंदर्भात माहिती देखील समितीच्या सदस्यांना देण्यात आली होती. त्यामुळे हा संपूर्ण भ्रष्टाचार उघडकीस करण्यासाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने मोठा लढा लढलेला आहे.प्रकाश बोथे यांच्या निलंबनासंदर्भात झालेल्या आदेशात म्हटले आहे की, बोथे यांनी विविध विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केलेला आहे. जसे पाईपलाईनचे काम, कार्यालयीन फर्निचर, कुलर्स, इलेक्ट्रिक मोटर,जनरेटर,कंत्राटी कर्मचारी भरती, जीएसटी भरणा नियमबाह्य कामांसह इत्यादींची खरेदी, छपाई कार्य, बायोमेडिकल वेस्ट मॅनेजमेंट,सिस्टीम खरेदी, व्हेंटिलेटर खरेदी, ऑक्सिजन कॉन्संट्रेटर, स्प्रे खरेदी, मोबाईल एक्सरे युनिटची खरेदी, डायलिसीस मशीनची खरेदी, नियमप्रमाणे हाफकिनच्या बायो फार्मास्युटिकल्सकडून खरेदी न करणे, विहित रकमेचे मुद्रांक शुल्क भरून विविध करारनामे न करणे, विविध प्रकारच्या खरेदीसंदर्भात फाईल व कागदपत्रे अपूर्ण ठेवणे, जडसंग्रह नोंदवहीमध्ये योग्य त्या नोंदी न घेणे, भांडाराची नियमाप्रमाणे सहा महिन्यातून एकदा पडताळणी न करणे, असे विविध प्रकारचे ठपके प्रकाश नामदेव बोथेंच्या कामकाजावर ठेवण्यात आलेले आहेत. विशेष म्हणजे जेंव्हा जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या भांडार विभागाचे लेखापरिक्षण झाले, तेंव्हा प्रकाश बोथे यांनी भांडार विभागाच्या कामकाजासंदर्भात योग्य दस्तऐवज सादरच केले नव्हते. कारण काहीही करून त्यांना त्यांचा भ्रष्टाचार लपवायचा होता, हे आता स्पष्ट झालेले आहे. भांडार विभागातील भ्रष्टाचारासंदर्भात प्रकाश बोथे यांच्यावर कारवाईचा बडगा तर उगारला गेला आहेच, परंतु या भ्रष्टाचारात केवळ बोथे हेच फक्त सामिल आहेत, असे कोणीही समजू नये. कारण



या भ्रष्टाचारात आणखीही काही कर्मचार्यासह बडे-बडे मासे सखोल चौकशी झाल्यास गळाला लागण्याची दाट शक्यता आहे. गेल्या काही वर्षांत जिल्हा रुग्णालयात येऊन गेलेल्या सर्वच जिल्हा शल्यचिकित्सक, प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक या सर्वांची चौकशी होणे गरजेचे आहे. जिल्हा रुग्णालयात आज भ्रष्टाचाऱ्यांचा प्रचंड बोलबाला आहे. त्यामुळे त्यातील सर्वांची चौकशी होऊन त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करणे अपेक्षित आहे. तसे झाल्यास जिल्हा सामान्य रुग्णालयातून भ्रष्टाचाराचा संपूर्ण नायनाट होईल आणि सर्वसामान्यांच्या चांगल्या आरोग्याचे ब्रीद घेऊन कार्यरत असणारे जिल्हा रुग्णालय खऱ्या अर्थाने जनतेचे असल्याचे सिद्ध होईल.जोपर्यंत ही सर्व प्रक्रिया पूर्ण होत नाही. तसेच जिल्हा रुग्णालयातील शेवटच्या भ्रष्टाचाऱ्यावर कारवाई होत नाही, तो पर्यंत सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन काही केल्या आपला हा लढा थांबवणार नाही. भ्रष्टाचारविरोधातील या अंतहीन लढ्यासाठी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने कार्यरत राहणार आहे

अजून बरेच काही पुढील भागात

## पळून गेलेले युगुल पोलिसांच्या ताब्यात युवकावर अत्याचारासह पोस्कोअंतर्गत गुन्हा दाखल

**जनसंचलन/ संग्रामपूर**

सव्वा दोन महिन्यापूर्वी संग्रामपूर तालुक्यातील एका गावातील १६ वर्षे ६ महिने वय असलेल्या एका अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची घटना उघडकीस आली होती. पोलिसांनी तपासादरम्यान १७ मे रोजी जळगाव खान्देश जिल्ह्यातून आरोपी व अल्पवयीन मुलीला ताब्यात घेतले. मुलीचे बयान नोंदवून आरोविरुद्ध अत्याचारासह पोस्कोअंतर्गत गुन्ह्याची नोंद केली. याप्रकरणी मुलीच्या नातेवाईकांच्या तक्रारीवरून ८ मार्च रोजी तामगाव पोलिस ठाण्यात भादंविच्या कलम ३६३ नुसार गुन्हा दाखल होता. त्यावर तामगाव ठाण्यातील तपास अधिकारी पोलिस उपनिरीक्षक जीवन सोनवणे, हेकॉ अनिल सुशीर, महिला पोकों सपना पवार यांनी तपास केला.



# ए.एस.पी.एम. आयुर्वेद महाविद्यालयाची मयुरी साबळे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठात सर्वप्रथम

## महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींना मिळाले संपूर्ण विद्यापीठात सर्वाधिक गुण



**जनसंचलन/बुलढाणा**

स्थानिक आनंदी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित आयुर्वेद महाविद्यालय, रुग्णालय व अनुसंधान संस्था, बुलढाणा येथील विद्यार्थ्यांनी सर्वोत्तम निकालाची परंपरा यावर्षीसुद्धा कायम ठेवत एक नवा विक्रम नोंदवला तो म्हणजे प्रथम वर्ष बी.ए.एम.एस.च्या उन्हाळी -२०२३ परीक्षेच्या महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने नुकत्याच जाहिर केलेल्या गुणवत्ता यादीमध्ये महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. मयुरी रामेश्वर साबळे हि संपूर्ण विद्यापीठात सर्वाधिक गुण प्राप्त करून अव्वल ठरली असून मयुरीला रचना-शारीर विषयात सुद्धा विद्यापीठात सर्वाधिक गुण मिळाले. ह्याच गुणवत्ता यादीत महाविद्यालयाची विदयार्थीनी कु. वैष्णवी विलास वाकडे हिनेसुद्धा क्रिया-शारीर विषयात विद्यापीठात सर्वाधिक गुण प्राप्त केले आहे. सर्वोत्तम निकालाची परंपरा कायम ठेवातांनाच सदर विदयार्थीनिंनी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातून सर्वाधिक गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त करून महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. राज्यातल्या ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षण सुलभतेने व गुणवत्तापूर्ण प्राप्त होण्याच्या दृष्टिकोनातून अल्पवाधितच स्थापन झालेल्या आनंदी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित सदर आयुर्वेद महाविद्यालयाने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. राजेंद्र वाघ सरांच्या प्रेरणेने तथा संस्थेचे उपाध्यक्ष मधुकरराव जायभाये, सचिव पंजाबराव इलग, संस्थेचे कोषाध्यक्ष व प्राचार्य डॉ. राजेश्वर उबरहंडे यांच्या मार्गदर्शनात विदयार्थी केंद्रित शिक्षणप्रणाली राबवण्याच्या दृष्टीने सक्षम कार्य केल्यामुळे महाविद्यालयाच्या गुणवत्तेत दिवसेंदिवस वाढ होत आहे. वरील विदयार्थीनींच्या उल्लेखनीय व दैदीप्यमान यशाबद्दल संस्थाध्यक्ष डॉ. राजेंद्र वाघ, उपाध्यक्ष मधुकरराव जायभाये, सचिव पंजाबराव इलग, कोषाध्यक्ष व प्राचार्य डॉ. राजेश्वर उबरहंडे, सहसचिव, ॲड. परागदादा वाघ, संचालिका डॉ. स्वाती उबरहंडे, विजय जायभाये, संचालिका सौ. शारदा वाघ, सौ. अनुसया इलग व समस्त प्राध्यापक वृंद यांनी अभिनंदन केले असून विदयार्थ्यांना पुढील उज्वल भविष्याकरिता शुभेच्छा प्रदान केल्या. ग्रामीण भागातील महाविद्यालयातून प्रथमच संपूर्ण विद्यापीठात प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त झाल्यामुळे संस्थेचे व विदयार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# उन्हाळी मूग पिकाचा शेतकऱ्यांना मिळतोय आधार

## कमी पाणी,कमी खर्चामुळे लागवड...



**जनसंचलन/ देऊळगाव कुंडपाळ**

यंदा खरीप व रब्बी हंगामातील पिकांनी शेतकऱ्यांना दगा दिला. त्यामुळे शेतकऱ्यांची सर्व मदार भुईमूग व उन्हाळी मूग पिकावर होती. कमी पावसाचे, कमी खर्चाचे आणि ७० ते ९० दिवसांत हे पीक येते. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांनी भुईमूग व मुगाची पेरणी मोठ्या प्रमाणावर केली आहे. येथील २५ शेतकऱ्यांनी तीस एकर क्षेत्रावर उन्हाळी मुगाची पेरणी केली आहे. अंतर्गत मशागत, तणनियंत्रण, फवारणी, कोळपणी यासह सर्व मशागतीची कामे पूर्ण झाली आहेत. सद्यस्थितीत परिसरात उन्हाळी मुगाचे पीक बहरले असून, लवकरच काढणीला येईल. तर काही शेतकऱ्यांनी काढणी केली आहे. बेमोसमी पावसामुळे मूग पिकाचा अंतर्गत मशागतीचा खर्च वाढला. मात्र, बाजारात चांगला भाव असल्याने शेतकरी समाधानी आहे. यावर्षी मुगाला चांगला भाव मिळेल, म्हणून शेतकऱ्यांनी अधिक खर्चही केला होता. मात्र, मे महिन्यात काही भागात गारपीट, वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाल्यामुळे मूग पिकावर मावा किडीचा व कोकडा रोगाचा प्रादुर्भाव झाला. यामुळे शेतकऱ्यांना कीड नियंत्रणासाठी अधिक खर्च करावा लागला.

# अवैध दारू विक्री विरोधात महिलांची साखरखेर्डा पोलिस ठाण्यात तक्रार



**जनसंचलन/हिवरा आश्रम**

हिवरा आश्रम येथील बसस्थानकावर खुले आम सर्रास अवैध दारू विक्री व्यवसाय करण्यात येत आहे. या ठिकाणी महिला, तरूणी यांचा येजा करण्याचा मुख्य रस्ता असून या ठिकाणी चार महाविद्यालय असून मुला मुलींचे वसतिगृह असून तसेच भाजीपाला विक्रेत्यांचे दुकाने आहेत. या ठिकाणी अवैध दारू विक्री सोबतच मदयपीसाठी मदय प्राशनाची उघडयावर सोय केलेली आहे. हा प्रकार सामाजिक व नैतीक दृष्ट्या अत्यंत किसळवाणा आहे. यामुळे शिक्षीत तरूण पीढी ही व्यसनाधिनतेकडे वळत असून हा प्रकार गंभीर असून त्याकडे प्रशासनाने काळजीपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. तरी साखरखेर्डा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांनी सदर विषयाकडे लक्ष घालून उचित कार्यवाही करावी असे निवेदन साखरखेर्डा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांना हिवरा आश्रम येथील महिलांनी दिले आहे. या निवेदनावर उषा कौतीक जाधव, पदमावती एकनाथ बोरकर, मंदाबाई सरकटे, नंदाबाई भिमराव जाधव, शोभाबाई रमेश कंकाळ, शोभाबाई केरू कंकाळ, रेखा जनांधन सरकटे सिमा सचिन जाधव, सुनंदा राहूल इंगळे यांच्यासह इतर महिलांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बसस्थानकावर महिलेची पर्स अज्ञात चोरट्याने केली लंपास



**जनसंचलन/ खामगाव**

येथील बसस्थानकावरील चोरीच्या घटना थांबायचे नाव घेत नसून पुन्हा एक घटना समोर आली आहे. काल बसमध्ये चढत असतांना प्रवाशी महिलेचे दागिने व पैसे असलेली पर्स अज्ञात चोरटया महिलेने लंपास केली आहे. बाळापूर तालुक्यातील बोरगाव वैराळे येथील सौ. दुर्गाबाई वसंता मानकर (३५) या काल सकाळी खामगाव बसस्थानकावर आलेल्या होत्या. कुन्हा येथे जाण्यासाठी त्या बसमध्ये चढत असतांना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरटया महिलेने त्यांच्या हातात असलेल्या पिशवीची चैन उघडून त्यातील छोटी पर्स लंपास केली. चोरी करुन ही महिला गर्दीतून पळून गेली. सदर पर्समध्ये सौ. मानकर यांचे ३४ हजारांचे दागिने व २ हजार रुपये होते. याबाबत सौ. मानकर यांनी शहर पोस्टेला तक्रार दिली असून पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात चोरटया महिलेविरुध्द कलम ३७९ भादंवीनुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# मासरूळ परिसरात शेती मशागतीच्या कामाला वेग

**जनसंचलन/मासरूळ**

मासरूळ परिसरात शेतातील जवळपास सर्वच पिकांची काढणी झाली आहे. पावसाअगोदर जमिनीची मशागत केल्यास उत्पादन क्षमतेत वाढ होते. त्यामुळे परिसरातील शेतकरी शेतीची पेरणीपूर्व मशागत करण्यात व्यस्त असल्याचे दिसून येत आहे. नांगरणीसह इतर कामांसाठी शेतकरी आता बैलजोडीऐवजी ट्रॅक्टरने मशागत करण्याला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे ट्रॅक्टरने नांगरणीसह इतर मशागत करण्याचे भाव गगनाला भिडले आहेत.पावसाळ्यापूर्वी जमिनीची नांगरणी केल्यास शेती चांगली तापते. त्यामुळे खरीप हंगामात पिके जोमाने येतात. शेतात तणाचे प्रमाण कमी होते आहे. ट्रॅक्टरच्या साहाय्याने नांगरणी केल्यास मातीची चांगली पलटी होऊन पिके जोमाने येतात. त्यामुळे शेतकरी बैल नांगरणीऐवजी ट्रॅक्टरच्या साहाय्याने मशागतीची कामे करताना दिसून येत आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# नागरीकांनी उष्माघातापासून बचाव करावा-आपत्ती व्यवस्थापनचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्याच्या तापमानात गेल्या काही दिवसांमध्ये वाढ होत आहे. या वाढत्या तापमानामुळे गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे नागरिकांनी उष्माघातापासून बचाव करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. उष्माघातापासून बचावासाठी नागरिकांनी उपायांचा अवलंब करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. विविध उपायांमध्ये शक्य असेल तेव्हा पुरेसे पाणी प्यावे. तहान लागली नसली तरीही पाणी प्यावे. तहान हे निर्जलीकरणाचे चांगले सूचक नाही. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे. ओरल रीहायड्रेशन सोल्यूशन चा उपयोग आणि लिंबू पाणी, ताक, लस्सी आणि फळांचे रस यासारखे घरगुती पेये प्यावे. टरबूज, खरबूज, संत्री, द्राक्षे, अननस, काकडी, कोशिंबिर, तसेच स्थानिक उपलब्ध फळे आणि भाज्या यासारखी उच्च पाणी सामग्री असलेली हंगामी फळे आणि भाज्या खाव्यात. पातळ, सैल, सुती आणि शक्यतो हलक्या रंगाचे कपडे घालावे. डोके झाकून ठेवावे. थेट सूर्यप्रकाशाच्या संपर्कात असताना छत्री, टोपी, टॉवेल आणि इतर पारंपारिक साधनांचा वापर करावा. उन्हात बाहेर जाताना शूज किंवा चप्पल घालावीत. रेडिओ, टीव्हीवर प्रसारित होणाऱ्या उष्णतेच्या लाटेबाबत बचाव उपायावर लक्ष द्यावे आणि स्थानिक हवामान बातम्यांसाठी वर्तमानपत्र वाचावीत. तसेच भारतीय हवामान खात्याची वेबसाइट mausam.imd.gov.in वर हवामानाविषयी अद्ययावत माहिती घ्यावी. हवेशीर आणि थंड ठिकाणी जास्त



वेळ घालवावे. थेट सूर्यप्रकाश आणि उष्णतेच्या लाटा रोखाव्यात. दिवसा खिडक्या आणि पडदे बंद ठेवावे, विशेषतः घराच्या सूर्यप्रकाशाच्या बाजूला, थंड हवा घेण्यासाठी रात्री खिडक्या उघड्या कराव्यात. घराबाहेर जात असल्यास घराबाहेरील कामे सकाळ आणि संध्याकाळच्या वेळेपर्यंत मर्यादित करावीत. दिवसाच्या थंड वेळेमध्ये बाहेरील कामाचे नियोजन करावेत. संवेदनशील किंवा जास्त जोखीम असलेल्यांनी कोणालाही उष्णतेचा ताण आणि उष्णतेशी संबंधित आजाराचा त्रास होऊ शकतो, काहींना इतरांपेक्षा जास्त धोका असतो त्यांनी त्याकडे अतिरिक्त लक्ष द्यावे. या घटकात लहान अर्भक आणि लहान मुले, घराबाहेर काम करणारे लोक, गर्भवती महिला, मानसिक आजारपण असलेल्या व्यक्ती, शारीरिकदृष्ट्या आजारी, विशेषतः हृदयरोग किंवा उच्च रक्तदाब, थंड हवामानापासून ते उष्ण हवामानापर्यंतच्या प्रवाशांनी त्यांच्या शरीराला उष्णतेला अनुकूल होण्यासाठी एक आठवडा वेळ द्यावा, जास्त श्रम टाळावेत आणि भरपूर पाणी प्यावे. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी खबरदारी घेताना एकटे राहणाऱ्या वृद्ध किंवा आजारी व्यक्तींवर देखरेख ठेवावी. त्यांचे दररोज आरोग्य निरीक्षण करावे. तसेच घर थंड ठेवावे व पडदे, शटर किंवा सनशेड वापरा आणि रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. दिवसा खालच्या मजल्यावर राहण्याचा प्रयत्न करावा. शरीर थंड करण्यासाठी पंखा, स्प्रे बाटल, ओलसर कापड आणि बर्फाचे टॉवेल वापरावेत. पाण्यात पाय बुडवल्याने निर्जलीकरण आणि शरीराची उष्णतेमुळे होणारी अस्वस्थता कमी होऊन जलद थंडावा मिळतो. नागरिकांनी उष्ण उन्हात बाहेर पडणे टाळावे, विशेषतः दुपारी १२ ते दुपारी ३ यावेळेत बाहेर असताना कठोर परिश्रम टाळावे. अनवाणी बाहेर जाऊ नये. अति उष्ण वेळेत स्वयंपाक करणे टाळावे. स्वयंपाक क्षेत्र पुरेशा प्रमाणात हवा येण्यासाठी दरवाजे आणि खिडक्या उघड्या ठेवाव्यात. अल्कोहोल, चहा, कॉफी, आणि कार्बोनेटे सॉफ्ट ड्रिंक्स किंवा मोठ्या प्रमाणात साखर असलेले पेय टाळावे. यामुळे शरीरातील जास्त पाणी कमी होते किंवा पोटात पेटके येऊ शकतात. उच्च प्रथिनेयुक्त अन्न टाळावे. तसेच शिळे अन्न खाऊ नये. उभ्या केलेल्या वाहनांमध्ये लहान मुले किंवा पाळीव प्राणी सोडू नये. त्यांना वाहनातील तापमान धोकादायक ठरु शकते, असे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन विभागाने कळविले आहे.

# ट्रक व दुचाकी अपघातात तोरणवाडा येथील युवक ठार

जनसंचलन/चिखली

ट्रक व दुचाकीचा अपघात झाल्याने तोरणवाडा येथील एक ४५ वर्षीय युवक गंभीर जखमी झाला होता सदर घटना १७ मे रोजी दुपारी ४:३० वाजेच्या सुमारास येथील किसनदेव महाराज मंदिरासमोर घडली असून जखमीवर चिखली येथे उपचार सुरू असतांना रात्री ८ वाजेच्या सुमारास प्राणज्योत मालवली. तोरणवाडा येथील दीपक नामदेव बिबे वय ४५ वर्षे हे आपल्या ताब्यातील दुचाकी ने अमडापुर कडून उदयनगर कडे येत असतांना किसन देव महाराज मंदिरासमोर दुचाकी व ट्रक क्रमांक एम. पी. ०४ १८१३ चा अपघात झाला यात दुचाकी स्वार दीपक बिबे गंभीर जखमी झाले असून पायाच्या मांडीनजीक चांगलाच मार लागला त्यांना उपस्थितांच्या मदतीने तात्काळ उदयनगर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या १०२ रुग्णवाहिकेने चालक सतीश रावळकर यांनी पुढील उपचारासाठी चिखली, येथील खासगी दवाखान्यात दाखल केले तेथे उपचार सुरू असतांना रात्री ८ वाजेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली मृतक दीपक वर १८ मे रोजी दुपारच्या सुमारास तोरणवाडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले सदर दुःखद घटनेमुळेउदयनगर तोरणवाडा सह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे दिपकच्या पश्चात भाऊ, बहीण पत्नी, मुलगा, मुलगी असा आप्तपरिवार आहे




# रूम्हणा येथे खरीप नियोजन कार्यक्रम संपन्न

जनसंचलन/ सिंदखेडराजा



खरीप नियोजन कार्यक्रम मौजे रूम्हणा येथे संपन्न झाला या कार्यक्रमासाठी उपस्थित मा.तालुका कृषी अधिकारी श्री पांचाळ साहेब यांनी बीज प्रक्रिया, सोयाबीन उगवण क्षमता चाचणी, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले, कृषी पर्यवेक्षक श्री कांगणे साहेब यांनी खरीप पूर्व नियोजन याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले, मंडळ कृषी अधिकारी जगताप साहेब यांनी नैसर्गिक शेती या विषयावर मार्गदर्शन केले, मंडळ कृषी अधिकारी बोरे साहेब यांनी शासकीय योजना याविषयी मार्गदर्शन केले, कृषी सहाय्यक एस एन नागरे यांनी उपस्थित शेतकरी, अधिकारी कर्मचारी तसेच गावातील पदाधिकारी सरपंच उपसरपंच यांनी कार्यक्रमास उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले

# येळगाव धरणातून गाळ काढण्यास सुरुवात

जनसंचलन/बुलडाणा



राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार अभियानाच्या दुसऱ्या टप्प्या अंतर्गत गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शेती योजनेला येळगाव धरण परिसरात शुक्रवार, दि. १७ मे २०२४ रोजी सकाळी ११.०० सुरूवात झाली. गुरुदेव श्री श्री रविशंकरजी प्रणित श्री सुमेरू रियालिटी प्रायव्हेट लिमिटेड बंगलोर, कर्नाटक आणि राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी शरद पाटील, नगरपालिका मुख्याधिकारी गणेश पांडे, जिल्हाधिकारी यांचे स्वीय सहायक रविंद्र लहाने, येळगावचे सरपंच श्री. तवकर, तसेच आर्ट ऑफ लिव्हिंगचे जलतारा प्रकल्प मेंटर सुनील भोजवानी, भगवान सावळे, चंदू पैठणे, जलयुक्त शिवारचे जिल्हा समन्वयक गोपाल वेरूळकर, भुषण मोरे, मयूर स्वामी, नितीन देशमुख, सुदर्शन खरात उपस्थित होते. सुरवातीला गुरुपूजेचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित ट्रॅक्टर आणि जेसीबी चालक-मालक यांच्यासोबत संवाद साधण्यात आला. भविष्यामध्ये परिसरातील शेती सुपीक करण्यासाठी आणि येळगाव धरण गाळमुक्त करण्यासाठी शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवावा. यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व बाबी शासन आणि श्री सुमेरू रियालिटी प्रायव्हेट लिमिटेड, बंगलोर यांच्या वतीने शेतकऱ्यांना सहकार्य करण्यात येणार आहे. त्यामुळे गाळमुक्त धरण व गाळयुक्त शेती योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी शरद पाटील आणि मुख्याधिकारी गणेश पांडे यांनी केले.

# शेतकऱ्यांची भुईमुग काढणीची लगबग

जनसंचलन/बुलढाणा



जिल्ह्यात अवकाळी पावसाची शक्यता हवामान विभागाच्या वतीने वर्तविण्यात आली आहे. गत दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्याने पावसाची धास्ती शेतकऱ्यांमध्ये आहे. त्यामुळे शेगाव, खामगाव तालुक्यत भुईमुगाच्या काढणीला वेग आला असून, शेतकरी कामात असल्याचे व्यस्त चित्र आहे. यंदा भुईमुगाचा पेरा मोठ्या प्रमाणात असून सध्या भुईमूग पीक काढणीला आले आहे. त्यात मजूर मिळत नसल्याने शेतकऱ्यांना परगावचे मजूर स्वखर्चाने आणावे लागत आहेत. त्यासाठी शेतकऱ्यांना वाहन खर्चाचा आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.

# शेतकऱ्यांसह सर्वांसाठी आनंदाची बातमी, मान्सून अंदमानमध्ये दाखल, महाराष्ट्रात या दिवशी येणार...





वृत्तसंस्था/मुंबई

उन्हाने घामाघूम झालेल्या सर्वांसाठी चांगली बातमी आहे. हवामान विभागाचा अंदाज खरा ठरला आहे. मान्सून १९ मे रोजी अंदमानमध्ये दाखल झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांना लगबगीने शेतीच्या कामांना लागावे लागणार आहे. मान्सून ३१ मे रोजी केरळमध्ये दाखल होणार आहे. तसेच महाराष्ट्रात जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात महाराष्ट्रात दाखल होणार आहे. मे महिना सुरु झाला म्हणजे नैऋत्य मान्सूनची वाट सर्व जण पाहतात. यंदा मान्सून अंदमान निकोबार बेटांमध्ये वेळेआधी येणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले होते. आयएमडीने १९ मे ही तारीख अंदमानमधील मान्सूनच्या आगमनाची दिली गेली होती. त्यानुसार अंदमान, मालदीव, कोमोरिनच्या काही भागात दाखल झाला आहे. बंगालच्या उपसागराच्या काही भागात मान्सून पोहचला आहे. मान्सून दाखल झाल्यामुळे अंदमानमध्ये पाऊस सुरु झाला आहे. यासंदर्भात ट्विट पुणे हवामान विभागाचे प्रमुख के एस होसाळीकर यांनी केले आहे. दरवर्षी अंदमानमध्ये २२ मे पर्यंत मान्सून दाखल होतो. यंदा तीन दिवस आधीच आला आहे.मान्सून अंदमान निकोबारमध्ये दाखल झाल्यानंतर आता त्याची वाटचाल केरळकडे सुरु होणार आहे. अंदमानमधून नैऋत्य मोसमी वाऱ्यांना केरळपर्यंत पोहचण्यासाठी दहा दिवस लागतात. मान्सूनची वाटचाल अशीच राहिली तर ३१ मे पर्यंत केरळमध्ये दाखल होणार आहे.मान्सूनपूर्व पाऊस केरळ, तामिळनाडू, पुदुचेरी, कराईकल या भागात होणार आहे. १९ आणि २० मे रोजी या राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता असल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. त्यामुळे रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. नैऋत्य मान्सून ३१ मे रोजी केरळमध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. २२ मे रोजी केरळमध्ये काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. २१ मे २०२४ रोजी २०४.५ मिमी पेक्षा जास्त पावसाची शक्यता आहे. मेघालयात १९ आणि २० मे रोजी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे.

## महाराष्ट्रात प्रचार थांबला, मातब्बर नेत्यांची प्रतिष्ठा पणाला, १३ जागांवर आज मतदान, कुणामध्ये होणार लढत?

वृत्तसंस्था/मुंबई

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या फेरीचा प्रचार शनिवारी संपला. २० मे रोजी होणाऱ्या मतदानादरम्यान, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, ओडिशा, झारखंड आणि जम्मू काश्मीर आणि लडाख या दोन केंद्रशासित प्रदेशांमधील एकूण ४९ जागांवर मतदान होणार आहे. या टप्प्यात संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, केंद्रीय मंत्री स्मृती इराणी, कौशल किशोर, साध्वी निरंजन ज्योती, भानू प्रताप वर्मा आणि योगी सरकारचे मंत्री दिनेश सिंह हे मोदी सरकारमधील रायबरेलीमधून काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या विरोधात लढत आहेत. पाचव्या टप्प्यात यूपीमध्ये १४ जागांवर निवडणूक होणार आहे.महाराष्ट्रात २० मे रोजी ५व्या टप्प्यात लोकसभेच्या १३ जागांसाठी निवडणूक लढवली जाणार आहे. राज्यात ४८ जागा आ-हेत आणि त्यापैकी १३ लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात मतदान होणार आहे. धुळे, दिंडोई, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, मुंबई उत्तर, मुंबई उत्तर-पश्चिम, मुंबई उत्तर-पूर्व, मुंबई उत्तर-मध्य, मुंबई दक्षिण-मध्य आणि मुंबई दक्षिण हे लोकसभा मतदारसंघ आहेत. सर्व जागांसाठी सकाळी ७ वाजता मतदान सुरू होईल आणि ४ जून रोजी मतमोजणी होणार आहे.महाराष्ट्रातील या १३ जागांपैकी सात जागांवर भाजपचे उमेदवार आहेत, तर सहा जागांवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. त्याचप्रमाणे महाविकास आघाडी मध्ये काँग्रेस तीन जागांवर, (शरदचंद्र पवार) दोन जागांवर आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना उर्वरित नऊ जागांवर रिंगणात आहे. महाराष्ट्रातील या १३ जागांवर शिवसेनेच्या दोन्ही छावण्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे.

## लोणार तालुक्यात अनेक गावात चक्रीवादळाचा तडाखा

जनसंचलन/लोणार

पाच वाजेच्या सुमारास लोणार तालुक्यातील अनेक गावामध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस पडला या वादळी वाऱ्यामुळे बीबी, किनगाव , देवानगर, खंडाळा,वझर आघाव, सह अनेक गावात घरावरील टिन पत्रे तसेच देव-नगर येथील जिल्हा परिषद शाळेवरील संपूर्ण टिन पत्रे तसेच अनेक ठिकाणी महावितरण चे पोल तसेच अनेक ठिकाणी झाडे जमीन उद्ध्वस्त झाली त्यामुळे अनेक ठिकाणी वाहतूक ठप्प झाली होती वादळ एवढे भयंकर होते की अर्धा तास काहीच समजत नव्हते की नेमके नुकसान किती करुन गेले तर त्यामुळे अनेक ठिकाणी नुकसानी झाल्याचं



निदर्शनास येत आहे वृत्तलेहीपर्यंत जीवित हानी झाली नसल्याचे समजते आहे

## मोताळा येथे घटस्फोटित -परीतक्त्या परिषद व परिचय मेळाव्याचे आयोजन

### प्रा.डी.एस.लहाने यांच्या संकल्पनेतील चौथी विधवा परिषद

जनसंचलन/बुलढाणा

विधवा घटस्फोटित महिलांच्या जी-वनात चैतन्य निर्माण करणे, त्यांचे विवाह घडवून आणणे, त्यांना समाजात सन्मानाचे स्थान देणे यासाठी प्रा. डी. एस. लहाने यांच्या संकल्पनेत तीन विधवा परिषदा जिल्ह्यात पार पडल्या आहे. तर चौथी विधवा, घटस्फोटित, परीतक्त्या परिषद व परिचय मेळा-वा चे आयोजन मोताळा येथे ३० मे २०२४ रोजी करण्यात आले आहे. शिवसाई परिवार व मानस फाऊंडेशन द्वारा आतापर्यंत २५ विधवां घटस्फोटित महिलांची लग्नगाठ बांधण्यात आली आहे. शेकडो महिलांनी अनिस्ट रूढी परंपरा जुगारून दिल्यात. शासकीय योजना व घरकुलामध्ये विधवा महिलांना प्राधान्य देण्यात आले आहे. अनेक ग्रामपंचायतीने विधवा प्रथा बंद करण्याचे ठराव घेतले. विधवा महिलांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देता आला हे सर्व जिल्ह्यांमध्ये झालेल्या विधवा घटस्फोटीत महिला परिषदेमुळे शक्य झाले. विधवा महिलांसोबत लग्न हा विषय आजही पचनी पडण्यास जड जात असल्याने विधवा परिषदेच्या माध्यमातून सामाजिक मानसिकता तयार करण्याचे काम उत्तम प्रकारे करण्यात आले आहे. अनेक अविवाहित तरूण आता विधवा घटस्फोटीत महिलांसोबत त्यांचा मुलाबाळांच्या स्वीकार करून लग्न करण्यास तयार झालेत. तीन परिषदांच्या माध्यमातून जवळपास २५ विधवा महिलांचे लग्न आतापर्यंत लागले आहे. याची दखल राज्यस्तरावर घेतली गेली आहे. कोल्हापूर येथे चित्रपट निर्माता आर. के. मेहता यांनी प्रा. लहाने यांना बोलवून तिथे सुद्धा परिषदेचे आयोजन केले आहे. हा उपक्रम राज्यभर दख-लपात्र होत आहे. तर मोताळा येथे दिनांक ३० मे रोजी विधवा परिषद आयोजित करण्यात आली आहे. समाजिक बदलाचे पाऊल ठरणाऱ्या या परिषदेकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. पुरोगामी महाराष्ट्रामध्ये आजही विधवा महिलांच्या अनेक समस्या आहेत. त्यांच्या मुलांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही, त्यांच्या रोजगाराच्या देखील समस्या आहेत. त्यांना सुद्धा जोडीदाराची गरज आहे. याचा विचारच समाज करत नाही. अनेक घटस्फोटीत महिलांनी सोसलेल्या त्रासामुळे त्यांना पुनर्विवाह नको, असे वाटते तर दुसऱ्या बाजूला अनेक तरुणांना लग्नासाठी मुलीच मिळत नाही. अशावेळी काळाची पाऊले ओळखून तरुणांनी विधवा घटस्फोटीत महिलांच्या मुला बाळांना स्वीकारून त्यांच्यासोबत विवाह करणे गरजेचे आहे.